BHARATI INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY RESEARCH & DEVELOPMENT (BIJMRD)

(Open Access Peer-Reviewed International Journal)

DOI Link : https://doi.org/10.70798/Bijmrd/04041013

Available Online: www.bijmrd.com | BIJMRD Volume: 4 | Issue: 04(1) | April 2026 | e-ISSN: 2584-1890

# शैक्षणिक माध्यमातून आर्थिक साक्षरता व आर्थिक सक्षमीकरण

**डॉ. लिलाधर खरपूरिये**

शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा, कळमेश्वर, नागपूर
Email: ldkharpuriye@gmail.com

**प्रस्तावना**

*आजच्या जलदगतीने बदलणाऱ्या जागतिक अर्थव्यवस्थेत आर्थिक साक्षरता हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत गरज बनली आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, डिजिटायझेशन, ऑनलाईन पेमेंट पद्धती, गुंतवणूकीचे नवे पर्याय, कर्जव्यवस्था, विमा, निवृत्ती नियोजन आणि आर्थिक सुरक्षा यांच्या वाढत्या गुंतागुंतीमुळे आर्थिक शिक्षण अनिवार्य ठरले आहे. अनेक अभ्यासातून दिसून आले आहे की, आर्थिक साक्षरता असलेल्या व्यक्ती आणि कुटुंबांचे आर्थिक निर्णय अधिक प्रभावी असतात. ज्यामुळे त्यांचे उत्पन्न, बचत, गुंतवणूक व आर्थिक स्थैर्य वाढते. मात्र आर्थिक असाक्षरतेमुळे चुकीचे गुंतवणूक निर्णय, कर्जाचे ओझे, फसवणूक, दिवाळखोरी, अनियोजित खर्च आणि अल्प बचत यांसारख्या समस्या उद्भवतात.*

*भारतासारख्या विकसनशील देशात आर्थिक साक्षरता हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण, वित्त मंत्रालय, आरबीआय, सेबी, एनएसडीएल आणि विविध गैर-शासकीय संस्थांच्या पुढाकाराने जनतेत आर्थिक शिक्षण पोहोचवण्याचे कार्य सुरू आहे. परंतु ग्रामीण भागातील स्त्रिया, विद्यार्थी, शेतकरी, लघु उद्योजक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये आर्थिक साक्षरतेचे प्रमाण आजही समाधानकारक नाही. म्हणून शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता कशी वाढू शकते आणि त्यातून आर्थिक सक्षमीकरण कशा प्रकारे साध्य होऊ शकते. याचा अभ्यास या शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.*

**शब्दसंकेत** *आर्थिक साक्षरता, आर्थिक सक्षमीकरण, कर्ज व्यवस्थ, आर्थिक निर्णयक्षमता, आर्थिक सुरक्षा.*

### आर्थिक साक्षरता म्हणजे काय? (What is the Financial Literacy)

आर्थिक साक्षरता (Financial Literacy) म्हणजे वित्तीय साधने, जोखीम व्यवस्थापन, बजेटिंग, बचत, गुंतवणूक, क्रेडिट, कर्ज व आर्थिक नियोजन यांचे ज्ञान, समज आणि व्यवहारातील उपयोग होय.

म्हणजेच ही केवळ माहिती नसून योग्य निर्णय क्षमता आहे. उदा. बचत व बजेटिंगचे ज्ञान, बँकिंग सेवांचा उपयोग, क्रेडिट व कर्ज व्यवस्थापन, गुंतवणुकीचे पर्याय (FD, RD, Mutual Funds, Shares, PPF इ.), विमा, निवृत्ती योजना, पेन्शन प्रणाली, डिजिटल व्यवहारांची सुरक्षितता, फसवणूक ओळखण्याची क्षमता, आर्थिक संकटात निर्णय घेण्याची क्षमता इत्यादी.

### आर्थिक सक्षमीकरण (Economic Empowerment)

आर्थिक सक्षमीकरण म्हणजे उत्पन्नवाढ, स्वावलंबन, आर्थिक निर्णयक्षमता, आर्थिक सुरक्षा व आर्थिक प्रगती साध्य करणे होय. आर्थिक साक्षरता म्हणजे आर्थिक सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे.

**आर्थिक साक्षरतेची गरज -**

आजच्या या माहितीच्या युगात कोणतेही आर्थिक निर्णय घेत असताना वाढत्या आर्थिक गुंतागुंतीमुळे योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण डिजिटल जगात सायबर फसवणूक वाढली असून सुरक्षित व्यवहारांसाठी ज्ञान आवश्यक आहे. शिवाय तरुण पिढी गुंतवणुकीकडे वळत असून आर्थिक नियोजन महत्त्वाचे आहे. वित्तीय समावेशन (Financial Inclusion) वाढवण्यासाठी आर्थिक शिक्षण महत्त्वाचे असून कर्जाचे ओझे टाळण्यासाठी वित्त व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आवश्यक आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये -(Objectives of Research Paper)**

1) आर्थिक साक्षरतेचे महत्त्व समजून घेणे.

2) शिक्षण प्रणाली आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी कशी सहाय्यक ठरू शकते याचा अभ्यास करणे.

3) आर्थिक सक्षमीकरणावर आर्थिक साक्षरतेचा प्रभाव तपासणे.

4) समाजातील विविध घटकांच्या सक्षमीकरणासाठी प्रस्तावित उपाय सुचवणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

प्रस्तुत शोधनिबंध प्रामुख्याने द्वितीयक (Secondary Data) स्रोतांवर आधारित आहे. यात सरकारी अहवाल, संशोधनपेपर, सर्वेक्षणे, मासिके, आर्थिक शैक्षणिक साहित्य व इंटरनेटवरील प्रमाणिक स्रोतांचा अभ्यास करण्यात आला. गुणात्मक पद्धत (Qualitative Research) वापरून विश्लेषण केले आहे.

**1) आर्थिक साक्षरतेचे महत्त्व समजून घेणे -**

आर्थिक साक्षरता म्हणजे व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनातील आर्थिक निर्णय योग्य प्रकारे घेण्यासाठी आवश्यक असलेली ज्ञान, कौशल्ये आणि समज होय. आधुनिक जागतिककरणाच्या युगात आर्थिक व्यवहारांची गुंतागुंत वाढत चालली असताना, प्रत्येक व्यक्तीला आर्थिक बाबींची मूलभूत माहिती असणे अत्यंत आवश्यक झाले आहे. आर्थिक साक्षरता ही केवळ पैशाचे व्यवस्थापन करण्याची कला नसून जीवनमान उंचावण्याचे एक प्रभावी साधन आहे.

आर्थिक साक्षरतेमुळे व्यक्ती बचत, गुंतवणूक, कर्जव्यवस्थापन, विमा, निवृत्ती नियोजन आणि आर्थिक जोखीम याबाबत सुजाण निर्णय घेऊ शकते. एखाद्या व्यक्तीने आपल्या उत्पन्नाचे नियोजन व्यवस्थित केले तर ती आर्थिक अडचणींचा सामना अधिक सक्षमतेने करू शकते. उदा. अनपेक्षित खर्चाचा सामना करण्यासाठी आपत्कालीन निधी तयार ठेवण्याचे महत्त्व आर्थिक साक्षरता शिकवीते. तसेच अनावश्यक कर्ज टाळणे आणि व्याजदरांचे गणित समजून घेणे हीदेखील आर्थिक साक्षरतेची गरजेची बाजू आहे.

आर्थिक साक्षरता समाजाच्या सर्व स्तरांसाठी तितकीच महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शहरी भागातील कामगार, उद्योजक, गृहिणी, विद्यार्थी या सर्वांना आर्थिक समज असणे गरजेचे आहे. कृषी क्षेत्रात आर्थिक साक्षरता असल्यास शेतकरी पीककर्ज, सबसिडी, विमा योजना, आणि बाजारव्यवस्था याबाबत योग्य निर्णय घेऊ शकतो. त्याचप्रमाणे, गृहिणी घरखर्चाचे सुयोग्य नियोजन करू शकते. तर विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअर आणि आर्थिक नियोजनाची दिशा मिळते.

आजच्या डिजिटल युगात ऑनलाइन व्यवहार, UPI, डिजिटल बँकिंग, ई-वॉलेट्स यांचा वापर प्रचंड वाढला आहे. या डिजिटल माध्यमांचा सुरक्षित आणि योग्य वापर करण्यासाठी आर्थिक साक्षरता अत्यावश्यक आहे. आर्थिक फसवणुकीपासून संरक्षण मिळविणे, डिजिटल सुरक्षेचे नियम पाळणे, OTP किंवा बँकेची माहिती शेअर न करणे. याबाबत जागरूकता आर्थिक साक्षरतेमधूनच येते.

आर्थिक साक्षरता ही आर्थिक सबलीकरणाचा पाया आहे. सुशिक्षित, स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम समाज निर्माण करण्यासाठी आर्थिक शिक्षणाची सर्वत्र गरज आहे. व्यक्ती आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तर तिच्या कुटुंबाचे, समाजाचे आणि

राष्ट्राचे विकास दरही वाढतो. आर्थिक साक्षरता असलेला समाज आर्थिक असमानतेवर मात करू शकतो आणि गरीबीचे दुष्परिणाम कमी करू शकतो. त्यामुळे आर्थिक साक्षरता ही आजच्या काळातील एक अनिवार्य जीवनकौशल्य बनली आहे.

थोडक्यात आर्थिक साक्षरता ही जीवनमान, आर्थिक स्थैर्य, सामाजिक समता आणि राष्ट्रीय प्रगती यासाठी आवश्यक असलेली मूलभूत गरज आहे. आर्थिक बाबींचे ज्ञान समाजाला सुजाण, सक्षम आणि स्वावलंबी बनवते. आर्थिक साक्षरतेचे आकलन हा आधुनिक शिक्षणव्यवस्थेचा अत्यावश्यक घटक आहे आणि आर्थिक सबलीकरणाचा सर्वात प्रभावी मार्गही ठरतो.

**2) शिक्षण प्रणाली आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी कशी सहाय्यक ठरू शकते -**

आर्थिक साक्षरता ही केवळ आर्थिक व्यवहार करण्याची क्षमता नसून ती व्यक्तीला जीवनातील प्रत्येक आर्थिक निर्णय तर्कशुद्ध पद्धतीने घेण्यासाठी तयार करते. समाजातील आर्थिक साक्षरतेचा स्तर उंचावण्यासाठी शिक्षण प्रणाली सर्वात प्रभावी माध्यम मानले जाते. कारण शिक्षणाच्या माध्यमातून मुलांपासून ते युवकांपर्यंत सर्व घटकांना संरचित, वैज्ञानिक आणि अनुभवाधारित ज्ञान दिले जाऊ शकते. त्यामुळे शिक्षण प्रणालीचे महत्व या दृष्टीकोनातून विशेष ठरते.

**1. औपचारिक शिक्षणाचा प्रभाव**

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दिले जाणारे औपचारिक शिक्षण आर्थिक संकल्पना स्पष्ट करण्यास मदत करते. मूलभूत गणित, आर्थिक व्यवहारांचे प्राथमिक ज्ञान, बजेटिंग, बचत, कर्ज व्यवस्थापन, गुंतवणूक साधने याबद्दलची माहिती जर अभ्यासक्रमातच समाविष्ट केली तर विद्यार्थी लहान वयातच आर्थिक निर्णय घेण्यासाठी तयार होतात.

**2. अभ्यासक्रमात आर्थिक विषयांचा समावेश**

अनेक देशांमध्ये आर्थिक साक्षरतेसाठी स्वतंत्र विषय किंवा मॉड्यूल समाविष्ट केले जातात. भारतातही शालेय अभ्यासक्रमात वाणिज्य, अर्थशास्त्र, गणित यांसारख्या विषयांमध्ये आर्थिक साक्षरतेची मूलतत्त्वे दिली जातात. परंतु यामध्ये अधिक प्रत्यक्षात्मक आणि जीवनकौशल्यांवर आधारित पद्धतींचा समावेश केल्यास विद्यार्थी आर्थिक संकल्पना अधिक स्पष्टपणे आत्मसात करू शकतात. उदा. वैयक्तिक बजेट तयार करणे, बँकिंग व्यवहार शिकणे, डिजिटल पेमेंट पद्धतींचे प्रात्यक्षिक, कर प्रणालीची माहिती, यामुळे शिक्षण अधिक जीवनसापेक्ष ठरते.

**3. शिक्षक प्रशिक्षणाची आवश्यकता**

शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेचा मुख्य घटक असल्यामुळे त्यांना आर्थिक संकल्पना समजावून सांगण्याचे कौशल्य आवश्यक असते. अनेकदा आर्थिक साक्षरतेचे मॉड्यूल उपलब्ध असले तरी प्रशिक्षित शिक्षकांच्या अभावामुळे ते अपेक्षित परिणाम देऊ शकत नाहीत. त्यामुळे शिक्षकांसाठी अद्ययावत प्रशिक्षण, आर्थिक क्षेत्रातील घडामोडींवर आधारित कार्यशाळा, डिजिटल साधनांचा वापर करण्याचे प्रशिक्षण यांचा समावेश केल्यास आर्थिक साक्षरता आणखी प्रभावीपणे रुजवता येते.

**4. अनुभवाधारित शिक्षण पद्धती**

सैद्धांतिक शिक्षणानेच फक्त आर्थिक कौशल्ये विकसित होत नाहीत. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण दिल्यास ते आर्थिक व्यवहार अधिक परिणामकारकपणे समजतात. उदा. शाळांमध्ये' बाल-बँक 'उपक्रम, मॉक शेअर मार्केट क्रिया, उद्योजकतेवरील प्रकल्प, बचत गटांची निर्मिती या उपक्रमांमुळे विद्यार्थी व्यवहारिक अर्थशास्त्र शिकतात आणि स्वयंपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम होतात.

**5. उच्च शिक्षणात आर्थिक साक्षरतेचे महत्त्व**

महाविद्यालयीन स्तरावर विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये (जसे BBA, B.Com, MBA) आर्थिक घडामोडी, गुंतवणूक, विमा, बँकिंग, फिनटेक यांचे सखोल ज्ञान दिले जाते. परंतु सर्वच विद्यार्थ्यांनी हे अभ्यासक्रम निवडलेले नसतात. त्यामुळे इतर शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी (कला, विज्ञान, व्यावसायिक अभ्यासक्रम) आर्थिक साक्षरता समाविष्ट करणे अत्यावश्यक ठरते. यामुळे प्रत्येक विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात असला तरी आर्थिकदृष्ट्या सक्षम नागरिक होऊ शकतो.

**6. डिजिटल शिक्षण आणि ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स**

आजच्या युगात डिजिटल पेमेंट, ऑनलाईन बँकिंग, UPI, डिजिटल वॉलेट्स, शेअर ट्रेडिंग ॲप यांचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे शिक्षण प्रणालीने डिजिटल आर्थिक कौशल्ये शिकवणे आवश्यक आहे. ई-लर्निंग कोर्सेस, व्हर्चुअल सिम्युलेशन, ऑनलाईन टूल्स यांच्या वापरामुळे आर्थिक साक्षरता अधिक सोपी व समजण्यासारखी बनते.

**7. ग्रामीण आणि वंचित घटकांपर्यंत पोहोच**

आर्थिक साक्षरता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण संस्था, स्वयंसेवी संस्था, शासनाच्या योजना यांच्याद्वारे ग्रामीण शाळांमध्ये विशेष उपक्रम राबवल्यास आर्थिक साक्षरतेची दरी कमी करता येते. उदा. ग्रामीण भागासाठी स्थानिक भाषेत साधे आर्थिक मॉड्यूल तयार करणे, बँक कर्मचाऱ्यांकडून शालेय स्तरावर कार्यशाळा, पालक सहभाग कार्यक्रम या उपक्रमांनी विद्यार्थीच नव्हे तर त्यांच्या कुटुंबाचेही आर्थिक ज्ञान वाढते.

**8. शिक्षण प्रणाली व शासन धोरणांचे एकत्रित योगदान**

शिक्षण व्यवस्था आणि शासनाच्या आर्थिक साक्षरता कार्यक्रमांचा परस्पर समन्वय हा आर्थिक सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. आर्थिक समावेशनासाठी सरकार विविध योजना राबवते आहे. जनधन योजना, डिजिटल इंडिया, PMJJBY, PMSBY, SIP/Mutual Funds जागरूकता इ. जर शिक्षण संस्थांनी या योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली तर ते योग्य आर्थिक निर्णय घेऊ शकतात.

**3) आर्थिक सक्षमीकरणावर आर्थिक साक्षरतेचा प्रभाव तपासणे-**

आर्थिक साक्षरता म्हणजे व्यक्तीला आर्थिक विषयांचे ज्ञान, आर्थिक व्यवहारांचे आकलन, बचत–गुंतवणुकीचे कौशल्य आणि वित्तीय जोखमींचे व्यवस्थापन करण्याची क्षमता मिळणे होय. आर्थिक सक्षमीकरण म्हणजे व्यक्ती, कुटुंब किंवा समुदायाला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी, निर्णयक्षम आणि सुरक्षित बनविण्याची प्रक्रिया. या दोन्ही संकल्पना परस्परपूरक असून एकमेकांच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहेत.

**1. आर्थिक निर्णयक्षमता वाढवणे**

आर्थिक साक्षरतेमुळे व्यक्तीला पैसे कसे व्यवस्थापित करावेत, खर्च–बचत–गुंतवणूक यांचा संतुलित वापर कसा करावा हे समजते. योग्य वित्तीय निर्णय घेण्याची क्षमता वाढल्याने आर्थिक चुकीचे निर्णय टळतात आणि कुटुंब आर्थिकदृष्ट्या स्थिर राहते. ही स्थिरता म्हणजेच आर्थिक सक्षमीकरणाचा मुख्य पाया आहे.

**2. बचत व गुंतवणुकीची जाणीव निर्माण होणे**

आर्थिक साक्षर व्यक्ती नियमित बचत आणि सुरक्षित गुंतवणुकीचे महत्त्व ओळखते. त्यामुळे व्यक्तीचे आर्थिक भविष्य सुरक्षित होते. दीर्घकालीन आर्थिक सक्षमीकरणासाठी आर्थिक सुरक्षा हा महत्त्वाचा घटक ठरतो. सुयोग्य गुंतवणूकीमुळे उत्पन्न वाढते आणि आर्थिक स्वावलंबन साध्य होते.

**3. आर्थिक जोखमींवरील नियंत्रण**

विमा, आपत्कालीन निधी, कर्ज व्यवस्थापन इत्यादी जोखीम व्यवस्थापनाच्या पद्धती आर्थिक साक्षरतेमुळे समजतात. जोखमीवर नियंत्रण मिळाल्याने आर्थिक आघातांपासून संरक्षण मिळते. आर्थिकदृष्ट्या सुरक्षित व्यक्ती व कुटुंब अधिक आत्मविश्वासाने जीवनातील निर्णय घेतात, ज्यामुळे सक्षमीकरणाची प्रक्रिया अधिक मजबूत होते.

**4. कर्ज व कर्जफेड व्यवस्थापन सुधारणा**

कर्ज चुकीच्या पद्धतीने घेणे, उच्च व्याजदर स्वीकारणे किंवा चुकीच्या योजनांत अडकणे हे आर्थिक साक्षरतेअभावी होते. आर्थिक

शिक्षण मिळाल्यास व्यक्ती योग्य योजनांची निवड करू शकते. व्याजदरांची तुलना करू शकते आणि कर्जफेड नियोजन करू शकते. जबाबदार कर्जवापर आर्थिक स्थिरता आणि सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**5. आर्थिक संधींचा लाभ घेण्याची क्षमता**

नवीन उद्यम, स्वयंरोजगार, कौशल्याधारित व्यवसाय, शासकीय योजनांतील आर्थिक लाभ इत्यादी संधींचा लाभ घेण्यासाठी व्यक्तीला आर्थिक माहिती आणि समज आवश्यक असते. आर्थिक साक्षरता या संधी ओळखण्यास आणि त्यांचा प्रभावी वापर करण्यास मदत करते. यामुळे उत्पन्नवाढ होऊन आर्थिक सक्षमीकरण मजबुती मिळते.

**6. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण**

आर्थिक साक्षरता ही महिलांसाठी विशेष महत्त्वाची आहे. घरगुती अर्थव्यवस्थेतील त्यांच्या भूमिकेमुळे आर्थिक ज्ञान त्यांना आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम करते. महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाल्यास संपूर्ण कुटुंब आणि समाज अधिक मजबूत बनतो. त्यामुळे आर्थिक साक्षरता ही समाजातील महिलांच्या सक्षमीकरणाचा मुख्य स्तंभ ठरते.

**7. सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी होणे**

आर्थिक साक्षरता वाढल्यास समाजातील दुर्बल, ग्रामीण, निम्न-आयवर्गीय घटकांना आर्थिक प्रणालीमध्ये प्रवेश मिळतो. बँकिंग सेवांचा वापर, डिजिटल व्यवहार, सरकारी आर्थिक मदत यांचा अधिक लाभ घेता येतो. यामुळे आर्थिक असमानता कमी होते आणि सर्व घटकांचे सक्षमीकरण साध्य होते.

**8. आर्थिक स्वावलंबन आणि जीवनमान सुधारणा**

आर्थिक साक्षरतेचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे आर्थिक स्वावलंबन. व्यक्तीला स्वतःच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याची क्षमता मिळते. आर्थिक स्वावलंबनामुळे जीवनमान सुधारते, सामाजिक दर्जा वाढतो आणि व्यक्ती आत्मविश्वासाने समाजात सहभागी होते.

**4) समाजातील विविध घटकांच्या सक्षमीकरणासाठी प्रस्तावित उपाय-**

समाजातील सर्व घटकांचे सर्वांगीण सक्षमीकरण हे प्रगत, समतोल आणि शाश्वत आर्थिक विकासाचे महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहे. आर्थिक साक्षरतेच्या माध्यमातून व्यक्ती, कुटुंबे आणि संपूर्ण समाजात आर्थिक स्थैर्य, निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख वर्तन निर्माण होऊ शकते. मात्र, समाजातील विविध घटकांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी, शैक्षणिक पातळी, संधींचा अभाव आणि स्त्रोतांची उपलब्धता वेगवेगळी असल्यामुळे त्यांच्या सक्षमीकरणासाठी भिन्न, लक्ष्यित आणि परिणामकारक उपाययोजना गरजेच्या ठरतात. खालील विविध सामाजिक घटकांच्या सक्षमीकरणासाठी काही उपाय सुचविले आहेत.

**1. महिलांसाठी सक्षमीकरणाच्या उपाययोजना**

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर आर्थिक साक्षरतेचा मोठा प्रभाव असतो. म्हणून महिलांना वित्तीय प्रणालीची ओळख करून देणे अत्यंत आवश्यक आहे.

**अ) स्व-रोजगार आणि उद्योजकता प्रशिक्षण**: महिलांसाठी कौशल्यआधारित प्रशिक्षण, सूक्ष्म वित्तीय सहाय्य, स्वयं-साहाय्य गटांद्वारे आर्थिक व्यवस्थापनाचे मार्गदर्शन.

**ब) डिजिटल वित्तीय साक्षरता:** UPI, मोबाइल बँकिंग, कर्ज योजना, विमा, डिजिटल बचत साधनांचा वापर याबाबत प्रशिक्षण.

**क) वित्तीय निर्णय प्रक्रियेत सहभाग:** कुटुंबातील आर्थिक नियोजनात महिलांचा सक्रीय सहभाग वाढवण्यासाठी जागरूकता मोहिमा.

**2. ग्रामीण आणि शेतकरी वर्गासाठी प्रस्तावित उपाय**

ग्रामीण भागातील लोकसंख्येला आधुनिक आर्थिक साधनांची आणि बँकिंग सेवांची मर्यादित उपलब्धता असते.

**अ) कृषी आर्थिक साक्षरता मोहिमा:** पीकविमा, शेतकरी कर्ज, अनुदान, बाजारभाव, उत्पादन खर्च विश्लेषण, कृषी-उत्पादन व्यवस्थापनाचे शिक्षण.

**ब) ग्रामीण वित्तीय सेवांचे विस्तार:** ग्रामीण बँका, बीसी-सखी/बीसी-मित्र मॉडेल, जन–धन खाते सक्रियता, डिजिटल पेमेंटची सुविधांची वाढ.

**क) शाश्वत शेती व विविधीकरण:** शेतकऱ्यांना कुटुंबीय अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन, जोखीम कमी करण्यासाठी पीकविविधीकरण व संरक्षण पद्धतींचे मार्गदर्शन.

**3. युवक आणि विद्यार्थ्यांसाठी सक्षमीकरण उपाय**

युवा वर्ग भावी आर्थिक व्यवस्थेचा कणा असल्याने त्यांची आर्थिक जाण अत्यंत महत्त्वाची आहे.

**अ) अभ्यासक्रमात आर्थिक साक्षरता समावेश:** शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर आर्थिक व्यवस्थापन, बचत, गुंतवणूक, कर्ज व्यवस्थापन, उद्योजकता यांची माहिती.

**ब) कौशल्य विकास कार्यक्रम:** स्टार्टअप मार्गदर्शन, वित्तीय तंत्रज्ञान (FinTech) प्रशिक्षण, नोकरीसाठी आवश्यक सॉफ्ट स्किल्स.

**क) मॉक गुंतवणूक आणि प्रॅक्टिकल शिक्षण:** विद्यार्थ्यांसाठी शेअरमार्केट सिम्युलेशन, बजेट स्पर्धा, एड्युफायनान्स वर्कशॉप्स.

**4. शहरी गरीब आणि असंघटित कामगार वर्गासाठी उपाय**

या घटकांना औपचारिक बँकिंग, कर्ज सुविधा आणि विमा संरक्षण मिळण्यात अडचणी येतात.

**अ) आर्थिक समावेशन कार्यक्रम:** लघुकर्ज योजना, जन–धन विमा, सामाजिक सुरक्षा योजना, भविष्यनिधी व पेन्शन योजनांचे प्रशिक्षण.

**ब) डिजिटल व्यवहारांची ओळख:** मोबाइल पेमेंट, डिजिटल वॉलेट्स वापरताना सुरक्षितता, फसवणुकीपासून बचाव याविषयी मार्गदर्शन.

**क) वाजवी व्याजदरावरील कर्ज उपलब्धता:** सावकारीपासून संरक्षण करण्यासाठी शासकीय योजनांची माहिती व त्यांचा वापर वाढवणे.

**5. वृद्ध आणि निवृत्त व्यक्तींसाठी उपाययोजना**

वृद्धांना आर्थिक फसवणूक, चुकीच्या गुंतवणुकीचा धोका अधिक असतो.

**अ) पेन्शन व्यवस्थापनाचे मार्गदर्शन:** राष्ट्रीय पेन्शन योजना, वरिष्ठ नागरिक बचत योजना, मासिक उत्पन्न योजना यांचा परिचय.

**ब) आर्थिक सुरक्षिततेचे प्रशिक्षण:** हेल्थ इन्शुरन्स, दीर्घकालीन वैद्यकीय खर्च नियोजन, सुरक्षित गुंतवणुकीविषयी जागरूकता.

**क) डिजिटल व्यवहारात सहाय्य:** सोपी प्रशिक्षण कार्यशाळा, डिजिटल व्यवहार करताना फसवणूक टाळण्याचे मार्ग.

**6. अल्पसंख्याक आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी उपाय**

या घटकांना आर्थिक संधींपर्यंत पोहोचणे कठीण जात असल्याने विशेष कार्यक्रम आवश्यक आहेत.

**अ) लक्ष्यित वित्तीय साक्षरता कार्यक्रम:** भाषिक-स्थानिक गरजांनुसार प्रशिक्षण.

**ब) शासकीय योजनांचे सुलभ मार्गदर्शन:** अल्पसंख्याक विकास महामंडळ, कौशल्य विकास योजना, शिक्षण कर्ज योजना.

**क) स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन:** अनुदानावर आधारित लघुउद्योग, उद्योजकता प्रशिक्षण, बाजारपेठेशी जोडणी.

**7. दिव्यांग व्यक्तींसाठी सक्षमीकरण उपाय**

दिव्यांग व्यक्तींना आर्थिक स्वावलंबनाची संधी उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे.

**अ) विशेषीकृत प्रशिक्षण:** ब्रेल, साइन लँग्वेज आणि श्रवणदोषानुसार अनुकूलित वित्तीय शिक्षण.

**ब) स्व-रोजगार सुविधा:** दिव्यांग उद्योजकांसाठी कर्जसहाय्य, कौशल्य मॉड्यूल्स.

**क) डिजिटल प्रवेशयोग्यता:** वित्तीय ॲप्स, बँकिंग पोर्टल्स दिव्यांग अनुकूल बनवणे.

**निष्कर्ष– (Conclusion)**

आजच्या बदलत्या जागतिक आणि राष्ट्रीय आर्थिक परिदृश्यात आर्थिक साक्षरता ही प्रत्येक व्यक्तीसाठी अत्यावश्यक कौशल्य बनली आहे. व्यक्तिगत आर्थिक निर्णयापासून राष्ट्रीय आर्थिक विकासापर्यंत प्रत्येक स्तरावर तिची उपयुक्तता प्रभावीरीत्या जाणवते. आर्थिक साक्षरतेमुळे व्यक्तीला पैशाचे व्यवस्थापन, बचत, गुंतवणूक, कर्ज व्यवस्थापन, विमा, तसेच आर्थिक जोखमींचा विचारपूर्वक सामना करण्याची क्षमता वाढते. त्यामुळे आर्थिक साक्षरता ही फक्त ज्ञानाची संकल्पना न राहता व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या सर्वांगीण आर्थिक सक्षमीकरणाचा पाया बनते.

शिक्षण प्रणाली आर्थिक साक्षरतेच्या प्रसारामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. शालेय व महाविद्यालयीन पाठ्यक्रमामध्ये आर्थिक शिक्षणाचा समावेश, व्यावहारिक उपक्रम, वित्तीय संस्थांशी सहयोग, तसेच डिजिटल वित्तीय साधनांच्या प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक व्यवहारांचे वास्तववादी आकलन विकसित होते. शिक्षणामुळे आर्थिक संकल्पना समजण्याबरोबरच योग्य आर्थिक निर्णयक्षमता वाढते, ज्यामुळे भविष्यात आर्थिक स्वावलंबन घडते. आर्थिक साक्षरतेचा थेट परिणाम आर्थिक सक्षमीकरणावर दिसून येतो. आर्थिकदृष्ट्या साक्षर व्यक्ती उत्पन्नाचे नियोजन करू शकते, बचतीची सवय लावते, योग्य गुंतवणूक साधनांची निवड करते आणि आर्थिक संकटांना तोंड देण्याची क्षमताही विकसित करते. विशेषतः महिलांचे, ग्रामीण समुदायांचे, विद्यार्थीवर्गाचे आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांचे सक्षमीकरण आर्थिक साक्षरतेमुळे मोठ्या प्रमाणात साध्य होऊ शकते. आर्थिक ज्ञानामुळे त्यांची स्वायत्तता, आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि आर्थिक सुरक्षितता वाढते.

समाजातील विविध घटकांचे सक्षमीकरण साधण्यासाठी समन्वित व बहुआयामी उपायांची आवश्यकता आहे. यात शैक्षणिक स्तरावर आर्थिक साक्षरतेचा सक्तीचा समावेश, स्वयंसेवी संस्था व वित्तीय संस्थांची भागीदारी, डिजिटल आर्थिक शिक्षण कार्यक्रम, महिलांसाठी विशेष वित्तीय प्रशिक्षण, ग्रामीण भागात जनजागृती मोहीम, तसेच उद्योजकतेला प्रोत्साहन देणारे कौशल्यविकास कार्यक्रम यांचा समावेश आहे. हे उपाय अमलात आणल्यास समाजाचा प्रत्येक घटक स्वावलंबी, सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या सुरक्षित होऊ शकतो.

थोडक्यात शैक्षणिक माध्यमातून आर्थिक साक्षरता वाढवणे हे आर्थिक सक्षमीकरणासाठी सर्वात प्रभावी आणि दीर्घकालीन उपाय आहे. शिक्षणामुळे आर्थिक ज्ञान, मूल्ये, कौशल्ये आणि योग्य निर्णयक्षमता विकसित होतात, ज्याचा लाभ केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही तर संपूर्ण समाजाच्या प्रगत व शाश्वत आर्थिक विकासाला गती मिळते. त्यामुळे आर्थिक साक्षरता ही आजच्या काळाची गरज असून तिचा प्रसार शिक्षणव्यवस्थेचा अविभाज्य घटक बनवणे हे आर्थिकदृष्ट्या सशक्त समाजनिर्मितीकडे जाणारे सर्वात परिणामकारक पाऊल ठरते.

**संदर्भ ग्रंथसूची- (References / Bibliography)**


1) दातार, एस. एम., (2018) आर्थिक साक्षरता–गरज आणि वास्तव, कंटिनेंटल पब्लिकेशन्स, पुणे

2) गायकवाड, एन. आर., ,(2019) भारतीय शिक्षण प्रणाली आणि आर्थिक जागरूकता, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई

3) चौधरी, व्ही. के., आर्थिक सक्षमीकरणाचे तत्त्वज्ञान, नागपूर विदर्भ प्रकाशन (2020)

4) Reserve Bank of India (RBI). (2021). Financial Literacy Framework. Mumbai: RBI Publications.

5) National Centre for Financial Education (NCFE). (2020). Financial Literacy and Inclusion Report. New Delhi: NCFE.

6) https://www.webmarathi.com

7) https://www.investopedia.com

8) https://marathi.economictimes.com

9) https://www.councilforeconed.org



**Citation:** **खरपूरिये. डॉ. लि.,** (2026) "शैक्षणिक माध्यमातून आर्थिक साक्षरता व आर्थिक सक्षमीकरण", *Bharati International Journal of Multidisciplinary Research & Development (BIJMRD)*, Vol-4, Issue-04(1), April-2026.